MHKO090001382011 रे.क.नं.क्रं. ६४/२०११

रे.क.नं.क्रं. ६४/२०११ नि. ५९ खाली आदेश

१ सदरचा अर्ज वादी यांनी अबेटमेंटचा आदेश रद्द करणेसाठी दाखल केला आहे. वादीचे थोडक्यात कथन असे की, वादी नं. १०) गुंडू बाबाजी भोगुलकर हे दि. ०४.०६.२०१७ रोजी मयत झाले आहेत वादी नं. १९) श्री.सतबा संतू केरकर हे दि. १७.१०.२०१५ रोजी मयत झाले आहेत. वादी नं. १० चे वारस रेकॉर्डवर आणणेसाठी १ वर्षे १ महिना ३० दिवस व वादी नं.१९ चे वारस रेकॉर्डवर आणणेसाठी २ वर्षे १० महिने १५ दिवसाचा विलंब झालेला आहे. वादी हे आजारी असल्याने त्यांना इतर वादी यांच्याबाबात माहिती उपलब्ध झाली नव्हती. तसेच वादी यांना वारस रेकॉर्डवर घ्यावे लागतात याबाबत माहिती नव्हती. त्यामुळे वादी यांनी वारस रेकॉर्डवर आणणेस जाणूनबजून विलंब केलेला नाही तरी सदरचा अर्ज मंजूर करावा अशी विनंती केली आहे.

२. प्रतिवादी यांनी आपले म्हणणे दाखल केले असून त्यांनी असे कथन केले आहे की, सदरच काम काढून टाकणेवर होते. वादी यांचा सदरचा दावा जुना आहे. वादी यांनी मुदतीत वारस रेकॉर्डवर आणले नाहीत. वादी यांनी मयत वादीयांचे मृत्यु दाखले न जोडता व वारसा डायरी न जोडता अर्ज दिला तो कायदयाने चालणेस पात्र नाही. त्याचप्रमाणे अर्जातील मजकूराबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. सदर कामी तुर्तातुर्त मनाई अर्जावर हुकुम मिळालेनंतर जाणीवपूर्वक कामात विलंब करण्याच्या दृष्टीने सदरचा अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे वादींचा सदरचा अर्ज खर्चासह नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

३. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला.

४. मयताचे वारस रेकॉर्डवर घेण्याकरता परवानगी न दिल्यास गुंतागुंत वाढू शकेल आणि अर्जाचा गुणावनुगुणावर निर्णय देणेस अडचण निर्माण होईल. अर्जाच्या निर्णयाच्या कामी सुलभता येण्यासाठी व वादी व प्रतिवादी यांच्यातील वाद अंतिमरीत्या संपूष्टात येण्याच्या दृष्टीने हा अर्ज मंजूर करीत आहे.

५. वरील सर्व कारणांचा एकत्र विचार करुन खालीलप्रमाणे आदेश केला आहे.

<u>आदेश</u>

१. सदरचा अर्ज मंजूर करण्यात आला.

सही/—

दिनांकः— ०९/०१/२०१९.

( यामीनी बोरावके )
दिवाणी न्यायाधीश, व. स्तर
गडहिंग्लज.